375

~~375~~ (143)

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या

## दिनांक २४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या नवव्या बैठकीचे कार्यवृत्त

१) बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची सोबत जोडपत्र 'अ' मध्ये दिली आहे.

२) बैठकीच्या प्रारंभी अध्यक्षांनी प्राधिकरणाच्या नवीन सदस्य असलेल्या व मुंबई महानगर पालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षा, श्रीमती लिलीबेन पंड्या यांचे स्वागत केले. त्यांनी मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वीच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. व्ही.एस.महाडिक, आणि पश्चिम रेल्वेचे त्यावेळचे महाव्यवस्थापक श्री. व्ही. रामनाथन यांनी केलेल्या सेवेची प्राधिकरणाच्या वतीने गौरवपूर्वक नोंद केली.

३) त्यानंतर कार्यसूचीवरील खालील बाबी चर्चेसाठी विचारात घेण्यात आल्या :-

बाब क्रमांक १ : दिनांक २७ ऑक्टोबर १९७६ रोजी भरलेल्या आठव्या बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे.

ठराव १०४ : दिनांक २७ ऑक्टोबर १९७६ रोजी भरलेल्या आठव्या बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

बाब क्रमांक २ : आठव्या बैठकीच्या कार्यवृत्तावर केलेली कार्यवाही

ठराव १०५ : दिनांक २७ ऑक्टोबर १९७६ रोजी भरलेल्या आठव्या बैठकीच्या कार्यवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

बाब क्रमांक ३ : १९७७-७८ साठी वार्षिक कामांचा कार्यक्रम

वार्षिक कामांच्या कार्यक्रमावरील चर्चेच्यावेळी पुढीलप्रमाणे सूचना करण्यात येऊन त्या मान्य करण्यात आल्या :-

(अ) खाजगी जमिनींचे संपादन करण्यासंबंधीच्या वाटाघाटी करण्याचे काम स्थायी समितीने हाती घ्यावे. परंतु त्या बाबतीतील अंतिम निर्णय मात्र प्राधिकरणाने घ्यावा ; आणि

(ब) पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत असलेला, जल व वायु प्रदूषण विषयक अभ्यास, विचारात घेऊन, जल संपत्ती व्यवस्थापन मंडळाखालील, जल व वायु प्रदूषण विषयक अभ्यासासंबंधीचे पथदर्शी प्रकल्प हाती घेण्यात यावेत.

त्यानंतर पुढील ठराव स्वीकृत करण्यात आला -

ठराव १०६ : असा ठराव करण्यात येतो की,

(एक) कार्यसूचीतील बाब क्र. ३ च्या जोडपत्र 'अ' 'ब' आणि 'क' मधील १९७७-७८ साठीच्या वार्षिक कामांचा कार्यक्रम याव्दारे संमत करण्यात येत आहे. परंतु जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळाच्या १९७७-७८ च्या वार्षिक कामांच्या कार्यक्रमात समाविष्ट असलेले जल आणि वायु प्रदूषण विषयीचे पथदर्शी प्रकल्प, प्रयत्नांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुंबई महानगर पालिकेशी विचार विनिमय करुन हाती घेण्यात यावेत.

(दोन) वार्षिक कामांच्या कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या योजनांच्या तपशीलास संमती देण्यासाठी स्थायी समितीस प्राधिकृत करण्यात आले आहे, आणि

(तीन) वार्षिक कामांच्या कार्यक्रमात समाविष्ट असलेल्या योजनांपैकी कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीसाठी जेव्हा खाजगी जमिनींची आवश्यकता असेल, आणि नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६, या अन्वये अशा जमिनी संपादन/करण्याचे काम पूर्ण होण्यास गैरवाजवी विलंब होत आहे अशी स्थायी समितीची खात्री झाली असेल तर, - (अ) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, अन्वये जमिनी संपादन करण्यासाठी किंवा (ब) जमिनी संपादन करण्यासाठी खाजगीरीत्या वाटाघाटी करण्यासाठी,

.......२/-

/ करणे शक्य नाही किंवा त्या अधिनियमान्वये जमिनी संपादन

अशारीतीने वाटाघाटी करुन जमिनी संपादन करण्याकरिता प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी, आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेण्यास, स्थायी समितीला प्राधिकृत करण्यात आले आहे.

बाब क्रमांक ४ : बांद्रा - कुर्ला संकुलाचा विकास

ठराव १०७ : असा ठराव करण्यात येत आहे की प्राधिकरणाच्या वतीने मुंबई महानगर पालिकेशी आणि महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाशी वाटाघाटी करण्यास आणि बांद्रा - कुर्ला संकुलातील क्षेत्रातील अनुक्रमे त्या दोहोंच्या मालकीच्या जमीनी ताब्यात घेण्यासंबंधीच्या अटी व शर्तींना अंतिम स्वरुप देण्यास, प्राधिकरणाच्या अध्यक्षांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

बाब क्रमांक ५ : बृहन्मुंबईतील पवई येथील क्षेत्र विकास योजना

ठराव १०८ : असा ठराव करण्यात येत आहे की :-

(एक) पवई येथील अंदाजे रु. १८१.७५ लक्ष रुपये खर्चाची क्षेत्र विकास योजना संमत करण्यात आली आहे,

(दोन) या योजनेसाठी आवश्यक असलेल्या जमीनी, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ अन्वये संपादन करण्यात याव्यात आणि अशारीतीने जमिनी संपादन करणे शक्य नसल्यास किंवा त्याबाबतीत गैरवाजवी विलंब होण्याची शक्यता असल्यास त्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, अन्वये संपादन करण्यात याव्यात, आणि

(तीन) तपशीलवार प्रकल्प गृहनिर्माण नागरी नवीकरण आणि पारिस्थितिकी मंडळाच्या कार्यालयाकडून तयार करण्यात यावा. आणि तो प्रकल्प, अंमलबजावणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून हाती घेण्यात यावा.

बाब क्रमांक ६ : पेण, जिल्हा कुलाबा येथील क्षेत्र विकास योजना

ठराव १०९ : असा ठराव करण्यात येत आहे की,

(एक) पेण येथील १४-१४ लाख रु. खर्चाची क्षेत्र विकास योजना संमत करण्यात आली आहे,

(दोन) तपशीलवार प्रकल्प, गृहनिर्माण, नागरी नवीकरण आणि पारिस्थितिकी मंडळाकडून तयार करण्यात यावी,

(तीन) त्या प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, अन्वये संपादन करण्यात यावी, आणि

(चार) ही योजना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अंमलात आणली जावी.

बाब क्रमांक ७ : ठाणे (पाच पाखाडी आणि चितळसर - मानपाडा-माजेवाडी) येथील क्षेत्र विकास योजना

ठराव ११० : असा ठराव करण्यात येत आहे की -

(एक) (अ) पाचपाखाडी - ठाणे, आणि (ब) चितळसर, मानपाडा, माजेवाडी ठाणे येथील अनुक्रमे रु. ५०.३२ लक्ष आणि रु. ५३.५२ लक्ष एवढ्या अंदाजित खर्चाच्या क्षेत्र विकास योजना प्राधिकरणाने संमत केल्या आहेत. परंतु, नंतरच्या प्रकल्पाला गृहनिर्माण, नागरी नवीकरण आणि पारिस्थितिकी मंडळाकडून मान्यता मिळवायची आहे,

(दोन) महानगर आयुक्तांस पुढील गोष्टी करण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे -

(अ) पाचपाखाडी क्षेत्र विकास योजनेसाठी आवश्यक असलेली जमीन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडून, दोघांमध्ये आपआपसात मान्य करण्यात येतील अशा दराने व अशा अटींवर व शर्तींवर मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या नावे बदली करुन घेणे, आणि (ब) चितळसर-मानपाडा - माजेवाडी प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जमीन, नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियमान्वये संपादन करण्याची व्यवस्था करणे, आणि अशारीतीने जमीन संपादन करणे शक्य नसल्यास किंवा त्या कामासाठी गैरवाजवी विलंब होण्याचा संभव असल्यास त्या जमीनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, अन्वये संपादन करण्याची व्यवस्था करणे, आणि

(तीन) तपशीलवार प्रकल्प गृहनिर्माण, नागरी नवीकरण आणि पारिस्थितिकी मंडळाच्या कार्यालयाकडून तयार करण्यात यावेत, आणि त्यानंतर ते अंमलबजावणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून हाती घेण्यात यावेत.

बाब क्रमांक ८ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचारी वर्गासाठी मोटारगाडी) विनियम, १९७७

ठराव १११ : असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक १७ नोव्हेंबर १९७६ रोजी भरलेल्या स्थायी समितीच्या पाचव्या बैठकीत स्थायी समितीने ठराव क्रमांक ३७ खाली तयार केलेले व शिफारस केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (कर्मचारी वर्गासाठी मोटारगाडी) विनियम, १९७७ चा मसुदा पुढील दोन फेरफारांस अधीन राहून संमत करण्यात आला आहे :-

(एक) स्थायी समितीने शिफारस केलेल्या मसुद्याच्या विनियम पाचच्या [illegible] वाक्यातील "मोटारगाडी" या शब्दाऐवजी "वाहन" हा शब्द दाखल करण्यात यावा.

(दोन) स्थायी समितीने शिफारस केलेल्या मसुद्याच्या विनियम आठ मधील "इतर शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील संघटना" या शब्दांऐवजी "शासकीय, अर्धशासकीय किंवा इतर सार्वजनिक क्षेत्रातील संघटना" हे शब्द दाखल करण्यात यावेत.

आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, उपरोक्त फेरफारांसह हे विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, च्या कलम ५० अन्वये प्राधिकरणाने तयार केल्याचे समजण्यात येईल.

बाब क्रमांक ९ : (एक) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थावर मालमत्ता समिति (रचना व अधिकार) विनियम, १९७७

(दोन) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (समितीच्या बैठकीमधील कामकाज चालविणे) विनियम, १९७७

ठराव ११२ : असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक १४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या स्थायी समितीच्या सहाव्या बैठकीत ठराव क्रमांक ३९ खाली तयार केलेले व शिफारस केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थावर मालमत्ता समिती (रचना व अधिकार) विनियम, १९७७, चा मसुदा संमत करण्यात आला आहे.

आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक १४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या सहाव्या बैठकीत स्थायी समितीने ठराव क्रमांक ३९ खाली तयार केलेले व शिफारस

........४/-

केलेले मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (समित्यांच्या बैठकीत कामकाज चालविणे) विनियम, १९७७, या मसुदा पुढील केवळ एका दुरुस्तीच्या अधीन राहून संमत करण्यात आला आहे, तो फेरफार पुढील प्रमाणे आहे "स्थायी समितीने शिफारस केलेल्या मसुद्याच्या विनियम ८ मधील "दोन" या शब्दाऐवजी "तीन" हा शब्द दाखल करण्यात यावा.

आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, च्या कलम ५० अन्वये प्राधिकरणाने वरील विनियम तयार केल्याचे समजण्यात येईल.

बाब क्रमांक १० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण(मंडळाच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते) विनियम, १९७७ चा मसुदा

ठराव ११३ : असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक १४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या आपल्या सहाव्या बैठकीत स्थायी समितीने तयार केलेले व शिफारस केलेले ठराव ४० खालील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (मंडळाच्या सदस्यांना द्यावयाचे भत्ते) विनियम, १९७७, चा मसुदा संमत करण्यात आला आहे. हे विनियम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, च्या कलम ५० अन्वये प्राधिकरणाने तयार केल्याचे समजण्यात येईल.

बाब क्रमांक ११ : उल्हासनगर येथे स्वयंचलित दूरध्वनि केंद्रासाठी जमीन

ठराव ११४ : असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४, अन्वये जमीन संपादन करण्यासंबंधीच्या बाबीची फेरतपासणी करण्यासाठी शासनाला विनंती करण्यात यावी. आवश्यकता भासल्यास अधिनियमात सुधारणा करण्याबाबत विचार करण्यासाठी शासनाला विनंती करण्यात यावी. म्हणजे त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निरनिराळ्या स्थानिक संस्था आणि शासकीय एजन्सी यांच्या विकास विषयक कार्यासाठी अशारीतीने जमीन संपादन करणे शक्य होईल.

आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, डाक व तार विभागासाठी उल्हासनगर येथे स्वयंचलित दूरध्वनी केंद्राकरिता जमीन संपादन करण्याच्या प्रकरणाबाबत त्या विभागाने, ही तातडीची बाब विचारात घेऊन या प्रश्नांची योग्यरीत्या सोडवणूक करण्याच्या दृष्टीने महानगर आयुक्त आणि सचिव, नगर विकास विभाग यांच्याशी विचार विनिमय करावा.

बाब क्रमांक १२ : बांद्रा - कुर्ला संकुलांतील भूखंडाचे वाटप

ठराव ११५ : असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पुनःप्रापण केलेल्या पहिल्या १५ हेक्टर जमीनीमधील वाटपासाठी उपलब्ध असलेल्या भूखंडांची विक्री खुल्या लिलावाद्वारे करण्यात यावी, मात्र अशा विक्रीच्यावेळी दक्षिण मुंबई मधून बांद्रा-कुर्ला क्षेत्रामध्ये आपले व्यापार व उद्योगधंदे आणण्याची ज्यांची इच्छा आहे अशा बोली बोलणाऱ्यांना व्यापारी तत्वावरील भूखंडाच्या बाबतीत प्राधान्य देण्यात यावे. तथापि, स्थायी समितीस, लिलावांत मिळालेल्या किंमती विचारात घेऊन, स्थायी समितीकडून ठरविण्यात येतील अशा किंमतीला शासनाला, अर्धशासकीय आणि सार्वजनिक क्षेत्रातील संघटनांना ते प्लॉटस् विकता येतील. स्थायी समितीला लिलावाच्या /वाटपाच्या अटी व शर्ती निश्चित करण्यास सुध्दा प्राधिकृत करण्यात आले आहे.

***************

चंसिप/-
१८.२.

जोडपत्र 'अ'

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २४ जानेवारी १९७७ रोजी भरलेल्या ९ व्या बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची

डॉ. रफिक झकेरिया, नगर विकासमंत्री

श्री. मनोहर जी. जोशी, मुंबईचे महापौर

श्री. एस्.जी. घोलप, उपमंत्री, लघुपाटबंधारे, पशुसंवर्धन, दुग्धोत्पादन आणि बंदरे व खार जमिनी विकास

श्री. हशु अडवानी, मुंबई

श्री. जे.सी.अगरवाल, अध्यक्ष, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट

श्री. एस्. डी. बसवंत, विधान परिषद सदस्य, शहापूर

श्री. हंस भुगरा, मुंबई.

श्री. सी.एम्. कोरिया, अध्यक्ष, हाऊस अर्बन रिन्युअल ॲन्ड एकॉलॉजी बोर्ड

श्री. आर्.के. चिंबूलकर, अध्यक्ष, सुधार समिती, मुंबई महानगर पालिका.

श्री. बी.जी. देशमुख, महानगर पालिका आयुक्त, मुंबई महानगर पालिका.

श्री. एस्.एस्. दिघे, विधान सभा सदस्य, मुंबई.

श्री. ए. एल्. गुप्ता, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे

श्री. के.जी. जिलानी, अध्यक्ष, बेस्ट समिती.

श्री. सुधीर जोशी, मुंबई

श्री. एम्.ए. बांडवाली, मुंबई

श्री. डी.के. खानविलकर, अध्यक्ष, अलिबाग नगर परिषद.

श्री. सोहनसिंग कोहली, मुंबई

श्रीमती लिलीबेन पंड्या, अध्यक्ष, स्थायी समिती, मुंबई महानगरपालिका.

श्री. पुष्पकांत ए. म्हात्रे, मुंबई.

श्री. एम्.एम्. किनी, जनरल मॅनेजर, बॉम्बे टेलिफोन्स.

श्री. डी.एन्. पाटील, अध्यक्ष, पंचायत समिती, पनवेल.

श्रीमती कमला रामन, विधान सभा सदस्य, मुंबई.

श्री. व्ही. के. टेंबे, विधान सभा सदस्य, मुंबई.

श्री. एच्.एम्. वंगारे, सभापती, जिल्हा परिषद, कुलाबा.

श्री. पी.व्ही. नायक, महानगर आयुक्त

सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग (निमंत्रित)

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (निमंत्रित)

श्री. पी. वी. केरकर, महाव्यवस्थापक, बेस्ट समिती, मुंबई (निमंत्रित)

श्री. जे.बी. डिसोझा, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग.

MINUTES OF THE NINTH MEETING OF THE B.M.R.D.A. HELD ON THE 24TH JANUARY, 1977.

1. The list of Members present is at Annexure 'A'.

2. In his opening remarks, the Chairman welcomed the new Member, Smt. Lilyben Pandya, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. He also placed on record the Authority's appreciation of the services rendered by Shri V.S. Mahadik, the then Chairman of the Standing Committee, Bombay Municipal Corporation, and Shri V. Ramanathan, the then General Manager, Western Railway.

3. The following items on the Agenda were thereafter taken up for discussion :-

ITEM NO. 1 : Confirmation of the minutes of the Eighth Meeting held on the 27th October, 1976.

Resolution 104 : The minutes of the Eighth Meeting held on the 27th October, 1976, were confirmed.

ITEM NO. 2 : Action taken on the minutes of the Eighth Meeting.

Resolution 105 : The action taken on the minutes of the Eighth Meeting held on the 27th October, 1976, were noted.

ITEM NO. 3 : Annual Works Programme for 1977-78.

During the discussion on the Annual Works Programme, it was suggested and agreed that :-

(a) negotiations for the acquisition of private lands may be undertaken by the Standing Committee, but a final decision on this should be taken by the Authority; and

(b) the Pilot projects under the Water Resources Management Board concerning the studies relating to Water and Air Pollution should be undertaken, keeping in view the Studies being done by the BMC, to avoid duplication.

The following Resolution was then adopted :-

Resolution 106 : Resolved that -

(i) the Annual Works Programme for 1977-78, as contained in the Annexures 'A', 'B' and 'C' to

.....2/-

Agenda Item No. 3, is hereby, approved, subject to the Pilot projects, included in the Annual Works Programme 1977-78 of the Water Resources Management Board concerning Water and Air Pollution studies being undertaken in consultation with the BMC to avoid duplication of efforts;

(ii) the Standing Committee is authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Works Programme; and

(iii) where private lands are required for execution of any of the schemes included in the Annual Works Programme, and where the Standing Committee is satisfied that such lands cannot be acquired under the Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976, or that the acquisition under that Act is likely to be unduly delayed, the Standing Committee is authorised to take all necessary measures (a) to acquire the lands under the B.M.R.D.A. Act, 1974, or (b) to undertake private negotiations for acquisition of lands and to submit proposals to the Authority for such acquisition by negotiations.

ITEM NO. 4 : Bandra-Kurla Complex development of --

Resolution 107 : Resolved that the Chairman of the Authority is authorised to negotiate on behalf of the Authority with the Bombay Municipal Corporation and the Maharashtra Housing Board and finalise the terms and conditions of taking over the lands respectively belonging to them in the area of the Bandra-Kurla Complex.

ITEM NO. 5 : Area Development Scheme at Pawai in Greater Bombay.

Resolution 108 : Resolved that -

(i) the area development scheme at Pawai, estimated to cost Rs. 181.75 lacs, is approved;

(ii) the lands required for the scheme be acquired under the Urban Land (Ceiling and Regulation) Act, 1976, and if this is not possible or is

......3/-

likely to be unduly delayed, then under B.M.R.D.A. Act, 1974; and

(iii) the detailed project should be prepared by the office of the Housing, Urban Renewal and Ecology Board and the project be taken up for execution by the B.M.R.D.A.

**ITEM NO. 6 : Area Development Scheme at Pen District Kulaba.**

**Resolution 109** : Resolved that -

( i) the area development scheme at Pen, estimated to cost Rs. 14.14 lacs, is approved;

( ii) the detailed project be prepared by the office of the H.U.R.E. Board;

(iii) the land required for the project be acquired under the B.M.R.D.A. Act, 1974; and

( iv) the scheme be executed by the B.M.R.D.A.

**ITEM NO. 7 : Area Development Schemes at Thane (Panchpakhadi and Chitalsar-Manpada-Majewadi).**

**Resolution 110** : Resolved that -

( i) the Area Development Schemes at (a) Panchpakhadi-Thane, and (b) Chitalsar, Manpada, Majewadi-Thane, estimated to cost Rs. 50.32 lacs and Rs.53.52 lacs respectively, are approved by the Authority, subject to the latter project being cleared by the H.U.R.E. Board;

( ii) the Metropolitan Commissioner is authorised to (a) get the land required for the Panchpakhadi Area Development Scheme transferred in the name of BMRDA from the Industries, Energy and Labour Department at the rates and on the terms and conditions to be mutually agreed upon; and (b) arrange for acquisition of the land required for Chitalsar-Manpada-Majewadi project under the Urban Land (Ceiling and Regulation) Act, and in case that is not possible or is likely to be unduly delayed, then under the B.M.R.D.A. Act, 1974; and

(iii) the detailed projects should be prepared by the office of the H.U.R.E. Board, and then taken up for execution by the B.M.R.D.A.

ITEM NO. 8 : The Bombay Metropolitan Region Development Authority (Staff Car) Regulations, 1977.

Resolution 111 : Resolved that the draft Bombay Metropolitan Region Development Authority (Staff Car ) Regulations, 1977, as prepared and recommended by the Standing Committee in its Fifth Meeting held on the 17th November, 1976, vide Resolution No. 37, are approved, subject to the following two modifications :-

(i) For the word "car" appearing in the last sentence of Regulation 5 of the draft recommended by the Standing Committee, the word "vehicle" should be substituted.

(ii) For the words "other Government or public sector organizations" appearing in Regulation 8 of the draft recommended by the Standing Committee, the words "Government, Semi-Government or other public sector organizations" should be substituted.

Resolved further that the Regulations, with the aforesaid modifications, shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the B.M.R.D.A. Act, 1974.

ITEM NO. 9 : (i) The B.M.R.D.A. Immovable Property Committee (Constitution and Powers ) Regulations, 1977;

(ii) The B.M.R.D.A. (Conduct of Business at the Meetings of the Committees). Regulations, 1977.

Resolution 112 : Resolved that the draft Bombay Metropolitan Region Development Authority Immovable Property Committee (Constitution and Powers) Regulations, 1977, as prepared and recommended by the Standing Committee in its Sixth meeting held on the 14th January, 1977, vide Resolution No. 39, are approved.

Resolved further that the draft Bombay Metropolitan Region Development Authority (Conduct of Business at the Meetings of the Committees) Regulations, 1977, as

.....5/-

prepared and recommended by the Standing Committee in its Sixth meeting held on the 14th January, 1977, vide Resolution No. 39, are approved, subject to one modification, viz., for the word "two" appearing in Regulation 8 of the draft recommended by the Standing Committee, the word "three" should be substituted.

Resolved further that the above Regulations shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the B.M.R.D.A. Act, 1974.

ITEM NO. 10 : Draft of the BMRDA (Allowances to Board Members) Regulations, 1977.

Resolution 113 : Resolved that the draft B.M.R.D.A. (Allowances to Board Members) Regulations, 1977, as prepared and recommended by the Standing Committee in its Sixth meeting held on the 14th January, 1977, vide Resolution No. 40, are approved. These Regulations shall be deemed to have been made by the Authority under Section 50 of the B.M.R.D.A. Act, 1974.

ITEM NO. 11 : Land for automatic exchange at Ulhasnagar.

Resolution 114 : Resolved that the Government be requested to re-examine the matter relating to acquisition of land under the B.M.R.D.A. Act, 1974, and, if necessary, to consider amendments to the Act so as to enable such land acquisition for the development activities of the various local bodies and Government agencies represented on the Bombay Metropolitan Region Development Authority.

Resolved further that the case of the proposed acquisition of land for the Automatic Exchange at Ulhasnagar for the Post and Telegraph Department be discussed by that Department with the Metropolitan Commissioner and the Secretary, Urban Development Department, with a view to finding an appropriate solution, having regard to the urgency of the matter.

ITEM NO. 12 : Bandra-Kurla Complex - allotment of plot in the ---

Resolution 115 : Resolved that the plots available for allotment from the reclamation of the first 15 hectares

by the B.M.R.D.A. in the Bandra-Kurla Complex be disposed of by open auction, subject to preference being shown, in the case of commercial plots, to bidders, who wish to shift their commercial activities from South Bombay to Bandra-Kurla. Plots may, however, be allotted by the Standing Committee to Government/Semi-Government and Public Sector Organizations at prices to be fixed by the Standing Committee on a consideration of the prices obtained in auction. The Standing Committee is also authorized to determine the terms and conditions of the auction/allotment.

Vp/5.2

ANNEXURE - 'A'

List of members present at the Ninth meeting of the Authority held on the 24th January, 1977 :

Dr. Rafiq Zakaria,
Minister, Urban Development and Chairman B.M.R.D.A.

Shri Manohar G. Joshi,
Mayor of Bombay, and Vice Chairman B. M. R. D. A.

Shri S.G. Gholap,
Dy. Minister for Minor Irrigation, Animal Husbandry, Dairy Development, Ports and Khar lands.

Shri J.B. D'Souza,
Chief Secretary to Government,
General Administration Department.

Shri Hashu Advani,
Bombay.

Shri J.C. Agarwal,
Chairman, B.P.T.

Shri S.D. Baswant, M.L.A.,
Shahapur.

Shri Hans Bhugra,
Bombay.

Shri C.M. Correa,
Chairman, HURE Board.

Shri R.K. Chimbulkar,
Chairman, Improvements Committee,
Bombay Municipal Corporation.

Shri B.G. Deshmukh,
Municipal Commissioner,
Bombay Municipal Corporation.

Shri S.S. Dighe, M.L.A.,
Bombay.

Shri A.L. Gupta,
General Manager, Central Railway,

Shri K.G. Jeelani,
Chairman, BEST Committee,
Bombay.

Shri Sudhir Joshi,
Bombay.

Shri M.A. Khandwani,
Bombay.

Shri D.K. Khanvilkar,
President, Alibag Municipal Council.

...... 2/-

Shri Sohansingh Kohli,
Bombay.

Smt. Lilyben Pandya,
Chairman, Standing Committee,
Bombay Municipal Corporation.

Shri Pushpakant A. Mhatre,
Bombay.

Shri M.M. Kini,
General Manager,
Bombay Telephones.

Dr. D.N. Patil,
Chairman, Panchayat Samiti,
Panvel.

Smt. Kamala Raman, M.L.A.,
Bombay.

Shri V.K. Tembe, M.L.A.,
Bombay.

Shri H.M. Wangere,
President, Zilla Parishad, Kulaba.

Shri P.V. Nayak, Metropolitan Commissioner,
B.M.R.D.A.

Secretary to Government U.D.
(Invitee)

Chief Executive Officer,
M.I.D.C.
(Invitee)

Shri P.B. Kerkar,
General Manager, BEST.
Bombay.
(Invitee).

bss/521977.